CMYK

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

● संपादक :- दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष - ०३ । अंक - ७५ । वार रविवार दि १४ डिसेंबर २०२५ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 75 Sunday 14 December 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

## पंतप्रधान आवास योजनेचे घरकुल रखडले!

### ■ सिरसाळ्यातील लाभार्थी चिंतेत

सिरसाळा (प्रतिनिधी):- केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या पंतप्रधान आवास योजने अंतर्गत (झच-ध) सिरसळ्यातील अनेक लाभार्थ्यांच्या घरांच्या बांधकामाला खीळ बसली आहे. पहिले हप्त्याचे १५,००० चा धनादेश (चेक) वेळेत जमा झाला असला तरी, दुसऱ्या हप्त्याचे ७०,००० चे अनुदान रखडल्यामुळे लाभार्थी कमालीचे बेजार झाले आहेत.

पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी टप्प्याटप्प्याने अनुदान दिले जाते.सिरसाळा येथील अनेक लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर त्यांनी उत्साहाने घराचे बांधकाम सुरू केले. काही लाभार्थ्यांनी पाया आणि भिंतीचे काम पूर्ण केले आहे. घराचे काम विशिष्ट टप्प्यावर पोहोचल्यानंतर, नियमानुसार दुसरा हप्ता ७०,००० चा धनादेश मिळणे अपेक्षित असते. मात्र, हा हप्ता अद्यापही लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. अचानक निधी अडकल्यामुळे लाभार्थ्यांची मोठी अडचण झाली आहे. मजुरांचे पैसे देण्यासाठी आणि बांधकामासाठी लागणारे पान २ वर...

# तपेनिमगाव येथील वाळू माफियांची बातमी दैनिक महाराष्ट्र आरंभ'ने प्रकाशित करताच, तलवाडा पोलीसांनी कारवाई करत वाळूने भरलेला ट्रॅक्टर-ट्रॉली केली जप्त

## अंदाजे सहा लाख पाच हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त; तीन दिवसांपूर्वी बातमी दैनिक आरंभ ने प्रकाशित केली होती

### ■ पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे दिसुन आले गोदामायावर करडे लक्ष, अवैध धंदे थरथरले!




तलवाडा । आरंभ वृत्तसेवा

**गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीच्या पात्रात वाळू माफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला होता. तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत तपेनिमगाव परिसरात केनीच्या साह्याने खुलेआम वाळू उपसा सुरू होता. गोदावरी नदी जणू काही आपल्या बापाचीच मालमत्ता असल्याच्या थाटात वाळू माफिया दिवस-रात्र शेकडो ब्रास वाळूचा बेकायदेशीर उपसा करत होते. या अवैध वाळू उपशामुळे नदीपात्र, शेती आणि पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला होता. या गंभीर प्रकाराबाबत काही शेतकऱ्यांनी 'दैनिक आरंभ'च्या प्रतिनिधींशी संपर्क साधून प्रत्यक्ष फोटो व माहिती दिली. खात्रीशीर पुरावे मिळाल्यानंतर 'दैनिक आरंभ'ने तपे निमगाव व राजापूर परिसरातील बेकायदेशीर वाळू उपशाची बातमी बुधवारी प्रकाशित केली. या वृत्ताची तात्काळ दखल घेत तलवाडा पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला.**



तलवाडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांच्या पथकाने वाळूने भरलेली ट्रॅक्टर-ट्रॉली वाहतूक करत असताना कारवाई करून आरोपी परमेश्वर भानुदास शिंदे (रा. तपे निमगाव, ता. गेवराई, जि. बीड) यास रंगेहाथ पकडले. आरोपीकडून एमएच २३ बी ७७९२ क्रमांकाचा ट्रॅक्टर, त्यास जोडलेली ट्रॉली व वाळूसह एकूण सुमारे ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तलवाडा पोलीस करत आहेत.

विशेष म्हणजे बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बेकायदेशीर वाळू उपशावर मोठ्या प्रमाणात आळा बसला असला, तरी काही वाळू माफिया अजूनही लपूनछपून नदीपात्रात केनी टाकून पाण्यातून वाळू उपसा करून लाखो रुपये कमावत असल्याचे उघड झाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रत्यक्ष कारवाईत पोलीस उपनिरीक्षक कैलास अन्नल्दास, पोलीस अंमलदार विठ्ठल राठोड यांचा सहभाग होता. दैनिक आरंभ'च्या निर्भीड वृत्तामुळे व शेतकऱ्यांच्या जागरूकतेमुळे वाळू माफियांवर कारवाई झाली असून, गोदावरी पात्रातील अवैध वाळू उपशाविरोधात पुढेही कठोर पावले उचलली जातील, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

### पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर ॲक्शन मोडवर


**बीडचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जातीने गोदावरी नदीत जाऊन पाहणी करावी असा उल्लेख दैनिक आरंभ ने बुधवार रोजी प्रकाशित केला होता. यांची तत्काळ माहिती घेऊन तीन दिवसात एक जनावर कारवाई करण्यात आली असुन बाकीच्या वाळू माफियात चांगलीच धडकी भरली असल्याचे दिसून येत आहे. बातमी नंतर कारवाई करण्यात आली असुन पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे विशेष लक्ष दिसुन येत असुन तर तलवाडा पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर हे देखील आता ऍक्शन मोड वर आल्याचे दिसून येत असुन दोन नंबर वाल्यात चांगलीच धडकी भरली असल्याचे बोलले जात आहे.**

### ओबीसी आंदोलकांवरील हल्ल्यांचा मुद्दा विधानसभेत गाजला

# आ. धनंजय मुंडेंच्या मागणीवर मुख्यमंत्र्यांचा थेट कडक कारवाईचा इशारा

## ओबीसी आंदोलक ॲड.मंगेश ससाणे यांच्या गाडीवर दगडफेक; धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल








बीड, (आरंभ वृत्तसेवा):- गेल्या काही दिवसांपासून ओबीसी आंदोलकांवर हल्ले होत असल्याचं प्रमाण वाढल्याचं चित्र दिसदून येत आहे. या मुद्द्यावर माजीमंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज विधान मंडळाच्या सभागृहात आवाज उठवला आहे. या हल्ल्यांविरोधात सरकारकडून उपाययोजना कारवाई करण्याची मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केलीयं. मुंडे यांच्या या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच वाक्यात उत्तर देऊन विषय संपवलायं. ओबीसी आंदोलकांवरील हल्ल्याबाबत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचं प्रत्युत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सभागृहात दिलं आहे.

या मुद्द्यावर बोलताना आमदार मुंडे म्हणाले, राज्यात मागील काही दिवसांपासून सामाजिक आंदोलन उभं करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांवर हल्ले घडवून आणले जात आहेत. याआधी लक्ष्मण हाके यांचा सहकारी पवन करवकर यांच्यावर हल्ला घडवून आणण्यात आला. एका झुंडीने त्यांचे थेट हातपाय तोडले आहेत. या प्रकरणात अद्याप एकही आरोपी पकडण्यात आलेला नसतानाच काल रात्री ओबीसी आंदोलक मंगेश ससाणे यांच्या वाहनावर हल्ला केल्याची घटना घडलीयं. राज्यात समाजिक पान २ वर...

### विश्वासघाताची साखळी उघड : फायनान्समधील कौशल्यातून मोटरसायकल चोरीचा पर्दाफाश

# बीड शहर पोलिसांनी मोटरसायकल चोरीचे जाळे उधळले, आठ गाड्या जप्त; आरोपी अटकेत




बीड । आरंभ वृत्तसेवा

बीड शहर पोलीस ठाणे हद्दीत मोटरसायकल चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत मोटरसायकल चोरीचे जाळे उघडकीस आणण्यात यश आले आहे. या कारवाईत बीड शहर पोलिसांनी मोटरसायकल चोरी करणाऱ्या एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून आठ (०८) चोरीच्या मोटरसायकली जप्त केल्या आहेत. सदर प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव कृष्णा उमेश अंतरकर, वय २५ वर्षे, रा. शिवशक्ती नगर, पाथर्डी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर असे आहे. प्राथमिक तपासात असे निष्पन्न झाले आहे की, सदर आरोपी यापूर्वी फायनान्स कंपनीत कार्यरत होता. कामाच्या काळात हप्ते थकवलेल्या दुचाकी गाड्या ओढून आणण्याचे (रीपोझेशन) काम तो करीत होता. याच कामातून त्याला वाहन उचलण्याचे कौशल्य व सवय लागली. याच कौशल्याचा गैरवापर करून आरोपीने पुढे मोटरसायकल चोरी करण्यास सुरुवात केली. चोरी केलेल्या मोटरसायकली तो पाथर्डी परिसरात विक्रीस काढत असे. मी फायनान्स/बँकेत काम करतो, या गाड्या हप्ते थकित असल्याने ओढून आणलेल्या आहेत अशी खात्री देऊन आरोपी नागरिकांचा विश्वास संपादन करीत होता. फायनान्समध्ये काम करतो अशी ओळख असल्यामुळे नागरिकांनी त्याच्यावर विश्वास ठेवून सदर मोटरसायकली खरेदी केल्या.

गाड्या आणि पैसे दोन्ही गमावले नागरिकांचे दुहेरी नुकसान

बीड शहर पोलिसांच्या तपासात सदर मोटरसायकली चोरीच्या असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्या पान २ वर...

### पोलीसांचे आवाहन

**बीड शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, दुचाकी वाहने नेहमी सुरक्षित व सीसीटीव्ही कॅमेरे असलेल्या ठिकाणीच पार्क करावीत. वाहन दोन वर्षांपेक्षा जुने असल्यास, त्यास डबल लॉक, हँडल लॉक तसेच आवश्यकतेनुसार व्हील लॉक वापरावे.फायनान्सची गाडी आहे, ओढून आणलेली आहे अशा कारणांवर वाहन खरेदी करताना संपूर्ण कागदपत्रांची खातरजमा केल्याशिवाय व्यवहार करू नये. संशयास्पद व्यक्ती, वाहन किंवा व्यवहार आढळल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. मोटरसायकल चोरीसारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी बीड शहर पोलीस कटिबद्ध असून, नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे.**

CMYK

# छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना विजय अभियान : स्वराज्याच्या संरक्षणाची आणि आधुनिक युद्धदृष्टीची क्रांती

इतिहासात काही योद्धे तलवारीने ओळखले जातात , काही सैन्यसंख्येने , तर काही रणांगणावरच्या धैर्याने . परंतु छत्रपती शिवाजी महाराज हे असे राष्ट्रनिर्माते होते , ज्यांनी युद्धाला बुद्धी , विज्ञान आणि दूरदृष्टीची जोड दिली . स्वराज्य उभारताना त्यांनी केवळ मावळ्यांच्या पराक्रमावर विसंबून न राहता आधुनिक लष्करी तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर केला . या दूरदृष्टीचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे तोफखाना विजय अभियान . हा अभियान एखाद्या एका लढाईपुरता मर्यादित नसून स्वराज्याच्या संरक्षणासाठी उभारलेली दीर्घकालीन , सुसूत्र आणि प्रभावी युद्धनीती होती . तोफेच्या नळीतून निघाली गर्जना , ती केवळ आग नव्हे – ती होती स्वराज्याची घोषणा . डोंगर हलले , आभाळ दुमदुमले , पण मावळ्यांच्या मनात भीती नाही उरली . ह्त्या काळात भारतातील युद्धपद्धतीत तोफखान्याचे महत्त्व झपाट्याने वाढत होते . मुघल , आदिलशाही , कुतुबशाही आणि पोर्तुगीज सत्तांकडे मोठ्या प्रमाणावर तोफा , बारुद आणि प्रशिक्षित तोफधारी होते . डोंगरी किल्ले असले तरी शत्रूच्या तोफखान्यापुढे ते टिकणार नाहीत ,



*वो जो तलवार के साथ अक़्ल भी रखता था ,*
*वही हर जंग में तारीख़ बदलता था .*

अशी सर्वसाधारण धारणा होती . मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी हीच धारणा मोडून काढली . त्यांनी तोफखान्याला केवळ आक्रमणाचे शस्त्र न ठेवता संरक्षण , प्रतिबंध आणि मनोवैज्ञानिक दहशतीचे प्रभावी साधन बनवले . तोफखान्याचे महत्त्व ओळखणारा दूरदृष्टीचा राजा : लहान वयातच शिवाजी महाराजांनी निजामशाही , आदिलशाही आणि मुघल सैन्याच्या हालचाली जवळून पाहिल्या होत्या . भविष्यातील युद्धे केवळ तलवार आणि भाल्यांवर चालणार नाहीत , हे त्यांनी अचूक ओळखले होते . म्हणूनच स्वराज्य उभारणीच्या सुरुवातीपासूनच तोफखान्याच्या विकासाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले . किल्ले जिंकताना शत्रूच्या तोफा ताब्यात घेणे , त्यांची दुरुस्ती करणे , आणि स्थानिक कारागिरांकडून नव्या तोफा तयार करून घेणे – ही प्रक्रिया त्यांनी योजनाबद्ध पद्धतीने राबवली . राजगड , तोरणा , पुरंदर , सिंहगड , पन्हाळा , विशाळगड , प्रतापगड यांसारख्या किल्ल्यांवर मजबूत तोफखाना उभारण्यात आला . किल्ल्यांच्या बुरुजांवर तोफा अशा प्रकारे बसवण्यात आल्या की शत्रूला चढाई करताना अनेक स्तरांवरून मारा सहन करावा लागे . सह्याद्रीचा डोंगर उतार , अरुंद वाटा आणि नैसर्गिक भूप्रदेश यांचा वापर करून तोफांचा प्रभाव अधिक तीव्र करण्यात आला . तोफखाना विजय अभियान म्हणजे केवळ तोफा जिंकणे नव्हे , तर शत्रूची संपूर्ण युद्धक्षमता खिळखिळी करणे होय . शिवाजी महाराजांनी अनेक वेळा शत्रूच्या किल्ल्यांवरील तोफा जिंकून त्या स्वराज्याच्या किल्ल्यांवर बसवल्या . त्यामुळे शत्रूला दुहेरी फटका बसत असे – एकीकडे त्यांची ताकद कमी होत असे आणि दुसरीकडे स्वराज्याची संरक्षणव्यवस्था अधिक मजबूत होत असे पुरंदरच्या मोहिमेत , पन्हाळ्याच्या संघर्षात , तसेच कोकणातील किल्ल्यांच्या संरक्षणात तोफखान्याचा अत्यंत प्रभावी वापर झाला . कधी थेट मारा , कधी दबाव , तर कधी केवळ तोफांची उपस्थिती दाखवून शत्रूला माघार घ्यायला भाग पाडले गेले . हे युद्ध केवळ रणांगणावर नव्हते , तर शत्रूच्या मनावर चाललेले होते . डोंगर बोलले तोफांच्या गर्जनेतून , स्वराज्य जागे झाले मावळ्यांच्या रक्तातून ,

तलवार होती हातात , पण बुद्धी होती डोळ्यांत ,

म्हणूनच इतिहास झुकला शिवरायांच्या पावलांत .

आरमारी तोफखाना आणि समुद्रावरील नियंत्रण : छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना अभियान डोंगरी किल्ल्यांपुरते मर्यादित नव्हते . त्यांनी समुद्रकिनाऱ्यावरही तोफखान्याचे महत्त्व ओळखले . सिंधुदुर्ग , विजयदुर्ग , कुलाबा , सुवर्णदुर्ग यांसारख्या किल्ल्यांवर शक्तिशाली तोफा बसवण्यात आल्या . या तोफांमुळे पोर्तुगीज , इंग्रज आणि सिद्दी यांच्यासारख्या समुद्री सत्तांना थेट आव्हान देण्यात आले . विजयदुर्ग हा त्या काळातील सर्वात आधुनिक आरमारी किल्ला मानला जातो . येथील तोफखान्यामुळे शत्रूची जहाजे किनाऱ्याजवळ येण्याचे धाडस करत नसत . हा तोफखाना म्हणजे स्वराज्याच्या सागरी सीमांचे अभेद्य कवच होते .

याच्या संरक्षणातील तोफखान्याची भूमिका : तोफखान्यामुळे स्वराज्याच्या किल्ल्यांवर दीर्घकाळ वेढा घालणे शत्रूसाठी अत्यंत कठीण झाले . पाणी व्यवस्था , अन्नसाठा आणि तोफांचा अचूक समन्वय यामुळे किल्ले महिनोन्महिने टिकत . परिणामी शत्रू थकून माघार घेत असे किंवा तहासाठी भाग पाडला जाई .

शिवाजी महाराजांनी कधीही अंधाधुंद तोफगोळेबार केला नाही . त्यांचा मारा नेहमी मोजका , नेमका आणि उद्दिष्टपूर्ण असे . हीच त्यांची लष्करी शिस्त आणि आधुनिक युद्धदृष्टी होती .

आजच्या पिढीसाठी संदेश : छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना विजय अभियान आपल्याला महत्त्वाचा धडा देते – परंपरेला आधुनिकतेची जोड दिली , तरच राष्ट्र टिकते . संरक्षण , तंत्रज्ञान , प्रशिक्षण आणि नियोजन या सर्व घटकांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे .

छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना विजय अभियान म्हणजे स्वराज्याच्या इतिहासातील सुवर्णअध्याय आहे . तलवारीइतकाच निर्णायक ठरलेला हा तोफखाना , स्वराज्याच्या आत्मविश्वासाचा आवाज बनला . आजही सह्याद्रीच्या किल्ल्यांवर उभ्या असलेल्या त्या तोफा आपल्याला सांगतात – स्वराज्य केवळ जिंकले गेले नाही , तर बुद्धीने , नियोजनाने आणि आधुनिक विचारांनी घडवले गेले .



**चंद्रकातं शेळके**
**(तहसिलदार,बीड)**

पान १ वरून..

**आ. धनंजय मुंडेंच्या मागणीवर मुख्यमंत्र्यांचा थेट कडक कारवाईचा इशारा**

शांततातच संपली आहे, एकमेकांना मारुन लोकं योद्धा म्हणून त्याचा गौरव करीत असल्याचं धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केलंय.

तसेच ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्यावरही हल्ला केल्याच्या दोन तीन घटना घडल्या आहेत. त्यानंतर नवनाथ वाघमारे यांच्यावरही हल्ला केला. सामाजिक आंदोलन करणारा कार्यकर्ता महाराष्ट्रात सामान्यरीत्या फिरु शकतो का? राज्यात सामाजिक समताच संपलीयं, एकमेकांना मारुन योद्धा पुकारलं जातं अटक होत नाही हे दुर्देव एका भावाला शिक्षा तर दुसऱ्यालाही झाली पाहिजे, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली आहे.

दरम्यान, ओबीसी आंदोलक मंगेश ससाणे यांच्या गाडीवर काल रात्रीच्या सुमारास हल्ला झाल्याची घटना घडली. बीडच्या धारुर-इंदापूर मार्गावर ही घटना घडली असून दोन दुचाकीस्वारांनी मागील बाजूने दगडफेक केल्याचं ससाणे यांनी आपल्या फेसबुक लाईव्ह व्हिडिओमध्ये सांगितलं आहे.

ओबीसी आंदोलक ॲड.मंगेश ससाने यांच्या गाडीवर हल्ला

ओबीसी आंदोलक मंगेश ससाणे यांच्या गाडीवर शनिवारी रात्री काही अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली होती. दोन महिन्यांपूर्वी पवन करवर याच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाची माहिती घेण्याकरता ड. ससाणे हे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गेले होते. त्यानंतर माजलगाववरून धारूरकडे जात असताना विसावा हॉटेलच्या पुढे दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी ससाणे यांची गाडी थांबवून दगडफेक केली. ड. ससाणे यांनी तात्काळ धारूर पोलीस ठाणे गाठत या हल्ल्याबाबतची माहिती धारूर पोलिसांना दिली. त्यावरून धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

-----------------

**बीड शहर पोलिसांनी मोटरसायकल चोरीचे जाळे**

सर्व मोटरसायकली पोलिसांनी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे संबंधित खरेदीदारांना खरेदी केलेल्या मोटरसायकली गमवाव्या लागल्या तसेच त्या बदल्यात दिलेली रक्कमही गमवावी लागली, मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी बीड शहर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे तपास करून आरोपीस अटक केली असून, त्याच्याकडून विविध ठिकाणांहून चोरीस गेलेल्या आठ मोटरसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक श्री. शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. महेश जाधव, पोलीस अंमलदार श्री. गहिनीनाथ बावनकर, पोलीस अंमलदार श्री. राम पवार, पोलीस अंमलदार श्री. इलियास शेख , मंगेश शिंदे, पोलीस अंमलदार श्री. शौकत शेख तसेच बीड शहर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच पथकातील इतर अधिकारी व अंमलदारांचा विशेष सहभाग होता. यातून शिवाजीनगर पोलीस ठाणे आणि बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील मोटरसायकलचे गुन्हे उघडकीस आले असून.. आणखी गुन्ह्यातील सहभाग् सिद्ध आणि निश्चित होणार आहे..

-----------------

**पंतप्रधान आवास योजनेचे घरकुल रखडले!**

पाया आणि भिंतीचे काम पूर्ण केले आहे. घराचे काम विशिष्ट टप्प्यावर पोहोचल्यानंतर, नियमानुसार दुसरा हप्ता ७०,००० चा धनादेश मिळणे अपेक्षित असते. मात्र, हा हप्ता अद्यापही लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. अचानक निधी अडकल्यामुळे लाभार्थ्यांची मोठी अडचण झाली आहे. मजुरांचे पैसे देण्यासाठी आणि बांधकामासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी लाभार्थ्यांकडे पैसे नाहीत. निवाऱ्याचा अर्धवट बांधकामांमुळे त्यांना सध्या राहण्यासाठी मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेकांना भाड्याच्या घरात किंवा तात्पुरत्या निवाऱ्यात राहावे लागत आहे, ज्यामुळे त्यांचे दुहेरी आर्थिक नुकसान होत आहे. या घरकुल लाभार्थ्यांनी तातडीने प्रशासनाकडे मागणी केली आहे की, त्यांचा रखडलेला दुसरा हप्ता ७०,००० तत्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा, जेणेकरून त्यांना वेळेत घराचे बांधकाम पूर्ण करता येईल आणि ते आपल्या हक्काच्या घरात सुरक्षितपणे राहू शकतील.

-----------------

# मुंबई विद्यापीठास 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे' यांचे नाव द्यावे – सुजाता पोहरे यांचे सरकारला सशक्त निवेदन



नांदेड (प्रतिनिधी): देशातील विविध राज्यांमध्ये व विद्यापीठांना महापुरुषांची नावे देऊन त्यांच्या विचारांचा वारसा जपला जात असताना, महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी मानल्या जाणाऱ्या मुंबई विद्यापीठास लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे, अशी ठाम आणि सशक्त मागणी अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या ज्येष्ठ नेत्या सुजाता पोहरे यांनी सरकारकडे केली आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व लोकशाही मूल्यांना दिशा देणाऱ्या कार्याची दखल घेत, त्यांच्या नावाने विद्यापीठ नामकरण होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नागपूर येथे पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सुजाता पोहरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच वित्त व नियोजन, कृषी मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार मंत्री आशिष जयस्वाल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. मुंबई विद्यापीठास 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे' यांचे नाव देण्यात यावे, अशी स्पष्ट मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अण्णा भाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर शोषित-वंचित समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढणारे लोकशाहीर होते. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लोककलेतून सामाजिक समतेचा, मानवतेचा आणि संघर्षाचा संदेश त्यांनी समाजापर्यंत पोहोचवला. अशा महापुरुषाच्या नावाने देशातील अग्रगण्य विद्यापीठाचे नामकरण झाल्यास नव्या पिढीला त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळेल आणि महाराष्ट्राची सामाजिक-सांस्कृतिक ओळख अधिक ठळक होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. । वेळी सुजाता पोहरे यांच्यासोबत शिष्टमंडळात मास्तर नितेश कराळे, दत्ता पाटील खानसोळे, अनिल इंगोले देशमुख, सोपान नकुले शेलवाडीकर, नारायण गोटमुकले भेंडेगावकर तसेच अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक बा. रा. वाघमारे यांचा समावेश होता. शिष्टमंडळाने सरकारकडे ही मागणी केवळ भावनिक नव्हे तर ऐतिहासिक न्यायाची बाब असल्याचे ठासून सांगितले. सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत सुजाता पोहरे यांनी सांगितले की, अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने मुंबई विद्यापीठाचे नामकरण झाल्यास ते महाराष्ट्राच्या सामाजिक न्यायाच्या परंपरेला साजेसे ठरेल. या मागणीला राज्यभरातून पाठिंबा मिळत असून, लवकरच यावर ठोस निर्णय होईल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# कापूस शेतकऱ्यांना बागायती न्याय द्या, आमदार विजयसिंह पंडितांचा सभागृहात सरकारला थेट सवाल

गेवराई, (आरंभ वृत्तसेवा):- गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेच्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत कापूस उत्पादक शेतकरी आणि मराठवाड्यातील मच्छिमार समाजाच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले. कापूस पीक हे बागायती पिकाच्या सर्व निकषांना पात्र असताना देखील त्याला तशी वर्गवारी दिली जात नाही, हे अन्यायकारक असल्याचे सांगत कापूस शेतीचा बागायती शेतीमध्ये समावेश करावा व नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बागायती वर्गवारीप्रमाणे आर्थिक मदत द्यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी सभागृहात मांडली.



कापूस उत्पादक शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय देण्याची हीच योग्य वेळ आहे, असे स्पष्ट शब्दांत आ.

विजयसिंह पंडित यांनी सरकारला सुनावले आहे. त्याचबरोबर मराठवाड्यातील रोजगारवाढीच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागामार्फत मोठे प्रकल्प, मध्यम प्रकल्प, पाझर तलाव, गाव तलाव, बंधारे आदी सर्व जलस्रोतांमध्ये मत्स्यबीज व झिंगाबीज संचयन करावे, अशी महत्त्वाची मागणीही त्यांनी केली.

यामुळे मासळी उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन मच्छिमार (कहार) समाजाच्या उपजीविकेला बळकटी मिळेल, असे त्यांनी ठामपणे मांडले. शेतकरी आणि मच्छिमार समाजाच्या हक्कांसाठी सभागृहात निर्भीडपणे आवाज उठवणारे आमदार विजयसिंह पंडित यांची ही भूमिका मराठवाड्यासाठी निर्णायक ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### लिंबागणेश येथे अतिवृष्टी अनुदानाच्या ई-केवायसीचा सखोल आढावा

# सेवा केंद्र चालकांना प्रलंबित ई-केवायसी तातडीने पूर्ण करण्याच्या सक्त सूचना

लिंबागणेश (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्यात काही महिन्यांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर पीक नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना शासनामार्फत आर्थिक मदत म्हणून अनुदान मंजूर करण्यात आले आहे. हे अनुदान जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार असून, यासाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य आहे. मात्र अद्याप अनेक शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित असल्याने त्यांचे अनुदान शासनाकडेच अडकून पडले आहे. या पार्श्वभूमीवर दि. १४ डिसेंबर रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश



येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी प्रत्यक्ष गावात भेट देत अतिवृष्टी अनुदानाच्या ई-केवायसी प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला. यावेळी तलाठी गणपत पोतदार, राजेंद्र शेलकर, तलाठी अक्षय शिंदे, तलाठी नारायण दराडे, महसूल सेवक, पत्रकार हरिओम क्षीरसागर तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे उपस्थित होते. ह्मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी लिंबागणेश येथील सर्व शासकीय व खासगी सेवा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन केंद्र चालकांशी संवाद साधला. अनेक शेतकऱ्यांची ई-केवायसी अद्याप प्रलंबित असल्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांचे अनुदान वेळेत मिळावे, यासाठी प्रलंबित सर्व ई-केवायसी तातडीने पूर्ण करून शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्याच्या सक्त सूचना त्यांनी सेवा केंद्र चालकांना दिल्या. एका शेतकऱ्याचेही अनुदान ई-केवायसीअभावी रखडता कामा नये. केंद्र चालकांनी कामात तातडीने गती आणावी, अन्यथा संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही यावेळी मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी दिला. अतिवृष्टीमुळे पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी हे अनुदान अत्यंत महत्त्वाचे असून अनेक शेतकरी या मदतीवर पुढील हंगामाची तयारी अवलंबून असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. मात्र ई-केवायसीसारख्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब यावेळी समोर आली. या प्रशासनिक हालचालीमुळे लिंबागणेश परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच प्रलंबित ई-केवायसी पूर्ण होऊन अनुदान थेट खात्यावर जमा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

पान ४ वरून..

**गेवराई महावितरण मध्ये अनागोंदीचा कळस! अधिकारी ओळखपत्र वापरत नाहीत**

आणि अखेर आंदोलनाचा पवित्रा घेतल्यावरच काम करण्याची तसदी अधिकारी घेतात. याचाच अर्थ, सामान्य ग्राहकांच्या कामांना 'आंदोलनाची धमकी' दिल्याशिवाय गती मिळत नसल्याचे गंभीर चित्र गेवराई उपविभागात आहे. बीड महावितरण करणार का कारवाई? वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नियमांचे उल्लंघन आणि सामान्य ग्राहकांच्या कामांची हेतुपुरस्सर टाळाटाळ यामुळे आता बीड महावितरण मुख्य कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यावर कोणती कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अनागोंदी कारभारामुळे महावितरणच्या प्रतिमेला मोठा धक्का बसत आहे. या गंभीर अनियमिततेवर बीडचे वरिष्ठ अधिकारी तातडीने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करतील आणि प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी ठोस पाऊल उचलतील का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

------------------

**स्व:गोपीनाथरावजी मुंडे साहेब आज प्रत्यक्ष आपल्या सोबत नसले तरी त्यांचे विचार पंकजाताई मुंडे यांच्या**

कपिल सौदा, कृष्णा तिडके, संभाजी सुर्वे, नरेश पवार, सुरेश पवार, धांडे साहेब, विकास ढोरमारे, राजेश चरखा, अमर सानप, राजू महुवाले, सुशील जाधव, घोडके सर, सलीम अत्तार, केशव बडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सहभाग नोंदवला. स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी आपल्या आयुष्यात शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब आणि वंचित घटकांसाठी सातत्याने संघर्ष केला. त्यांच्या याच विचारांना पुढे नेत पंकजाताई मुंडे सामाजिक, विकासात्मक आणि लोकहिताच्या कार्यातून त्यांचा वारसा जपण्याचे काम करत आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान, शालेय साहित्य वाटप, रुग्णांना फळ वाटप, अनाथांना भोजन, दिव्यांगांना सहाय्य साहित्य वाटप असे विविध सामाजिक उपक्रम भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात राबविले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

------------------

**३१व्या अखंड नामस्मरण सोहळ्याची**

हारीदास बडगे, सुनिल लोंढे, समाधान बनसोडे, राहुल बडगे, नानासाहेब बडगे, अवधूत बडगे, बळीराम बडगे, विशाल बडगे यां मान्यवरांसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला मंडळी आणि असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, श्रद्धा आणि सेवाभाव यांचा संगम असणारे श्री क्षेत्र दत्तमंदिर हे केवळ पूजेचे स्थान नसून, भक्ती, श्रद्धा आणि एकतेचे प्रतीक आहे. दरवर्षी होणारे नामस्मरण व गीता पारायण सोहळे समाजात अध्यात्मिक जागृती घडवतात. मंदिर विकासासाठी राजेंद्र मस्के यांनी घेतलेला पुढाकार ही भाविकांच्या सेवेसाठी प्रेरणादायी पाऊल ठरणार आहे. या निर्णयाचे ग्रामस्थ व भाविकांनी उत्साहात स्वागत करून राजेंद्र मस्के यांना धन्यवाद दिले आहेत.

----------------

**होर्डिंग्जमुक्तीसाठी नाशिक**

कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

बीड शहरात सध्या नेते व व्यावसायिकांकडून सर्रासपणे अनधिकृत बॅनर, कटआऊट्स व होर्डिंग्ज लावले जात असून त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत आहे. तसेच रस्त्यांवर अडथळे निर्माण होऊन अपघातांचा धोका वाढला आहे. मात्र नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या प्रकाराला आळा बसत नसल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन, प्रशासन मौनात नगरपालिका निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर बीड नगरपालिकेने फक्त ३८ ठिकाणी बॅनर व कटआऊट्स लावण्याची परवानगी दिली होती. असे असतानाही शहरभर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बॅनर लावण्यात आले. आचारसंहितेचे स्पष्ट उल्लंघन होऊनही नगरपरिषद प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने संशय व्यक्त केला जात आहे. न्यायालयीन आदेश केवळ कागदोपत्री? यापूर्वी न्यायालयाने राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांना शहर बॅनरमुक्त ठेवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यानुसार पालिकांकडून दरवर्षी शपथपत्र दाखल केले जाते. मात्र प्रत्यक्षात बॅनरमुक्ती केवळ कागदोपत्रीच असून, न्यायालयाची दिशाभूल केली जात असल्याचा गंभीर आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांपर्यंत निवेदन या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरिषद बीड व पोलीस अधीक्षक बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री अजितदादा पवार यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

बीड शहरात नाशिक पॅटर्नप्रमाणे बॅनरवर झळकलेल्या व्यक्तींवर थेट एफआयआर दाखल करून कडक कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

-----------------

**बीड जिल्ह्यातील सिरसाळा ग्रामपंचायतला तातडीने नगरपंचायतीचा दर्जा**

प्रमाणात वाढले आहे. उद्योगधंद्यांची उपस्थिती: गावात ४० टक्क्यांहून अधिक उद्योगधंदे कार्यरत आहेत. फप्रमुख बाजारपेठ=

सिरसाळा हे परिसरातील एक मोठी बाजारपेठ आणि व्यापारी केंद्र आहे.

नागरी सुविधांची गावात प्राथमिक आरोग्य रुग्णालय, मंजूर एम.आय.डी.सी. आणि बाजार समितीचे उप आवार यांसारख्या नगरपंचायतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

# कोमलवाडी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न; माजी विद्यार्थी संघाची स्थापना

## कोमलवाडी जिल्हा परिषद शाळेला नवे बळ; माजी विद्यार्थ्यांनी घेतली शाळा विकासाची जबाबदारी

**नवनाथ आडे । गेवराई**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोमलवाडी येथे आज माजी विद्यार्थी मेळावा अत्यंत उत्साहात पार पडला. या मेळाव्यास गावातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेले मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. त्यानंतर व्यासपीठावरील अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक हुलजूते सर यांनी कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी शासन निर्णयानुसार माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याबाबतचे नियम वाचून दाखवले तसेच नियमानुसार संघ स्थापन करण्याची प्रक्रिया उपस्थित माजी विद्यार्थ्यांसमोर मांडली. यानंतर उपस्थित माजी विद्यार्थ्यांमध्ये सखोल साधकबाधक चर्चा झाली.

या चर्चेनंतर सर्वानुमते माजी विद्यार्थी संघ, जि.प. प्राथमिक शाळा कोमलवाडीची स्थापना करण्यात आली. संघाच्या अध्यक्षपदी रघुनाथ नावडे,





उपाध्यक्षपदी जगदीश भोसले तर कोषाध्यक्षपदी रामनाथ देवकर यांची निवड करण्यात आली. यावेळी संपूर्ण कार्यकारी मंडळाचीही निवड करण्यात आली. यानंतर काही माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी व विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी अधिक प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. यावर शाळेतील दोन्ही शिक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद देत, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने काम करत राहू, अशी ग्वाही दिली.

तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी, गुणवत्ता वाढीसाठी व शाळा अधिक सुंदर करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पूर्ण व्हाव्यात, असे आवाहन करण्यात आले. शाळेला भेडसावणाऱ्या विविध समस्यांची मांडणी शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांसमोर केली. यावेळी आर्थिक, भौतिक, वस्तुस्वरूपात किंवा इतर कोणत्याही स्वरूपात शाळेस मदत करण्याचे आवाहन सर्व माजी विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन शाळेचे माजी विद्यार्थी व शिक्षक दिवेकर सर यांनी केले. हा मेळावा शाळा माजी विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा ठरला असून शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी दिशा देणारा ठरला आहे.

# प्रा. अण्णासाहेब मतकर यांनी स्वखर्चाने केल्या गोरगरीब अनाथ दिव्यांग बांधवांना रगी वाटप



बीड (प्रतिनिधी):– बीड शहरातील अनाथ दिव्यांग बांधव यांना जन स्वराज्य ग्रुप फाउंडेशन व राष्ट्रीय समाज पक्ष यांच्या माध्यमातून प्राध्यापक अण्णासाहेब मतकर यांच्या संकल्पनेतून थंडीच्या बचावापासून अनाथ दिव्यांग बांधवांना रगीच वाटप करण्यात आले. यावेळी त्यांच्यासमवेत

प्रा. परशुराम काशीद विद्यार्थी जिल्हाध्यक्ष ,अंकुश गवळी युवा पत्रकार ,अभिषेक भावले , निखिल हकदार , ज्ञानेश्वर ठोसर व. समाजामध्ये अनेक गरीब पीडित लोक आहेत .ज्यांना देवाने सर्व काही दिलेले आहे .तंदुरुस्त शरीर चांगली बुद्धी व दूरदृष्टी ही सर्वात मोठी श्रीमंती आहे याची भान ठेवून आपण समाजातील उपेक्षित गरजूवंतांना आपल्या ताकतीनुसार प्रत्येकाने मदत केली केली तर अनाथ बेघर किंवा अपंग अशा लोकांना मदत होईल व हेच एक पुण्याचं काम आहे साधुसंतांनी पण हेच सांगितलं आहे ज्याला गरज आहे त्याला मदत करा तो तुम्हाला आशीर्वाद देईल ज्याला गरज नाही त्याला मदत केली तर तो तुमच्याकडे लक्षही देणार नाही त्यामुळे मित्रांनो हे जीवन पुन्हा नाही एक दिवस हे जग आपल्याला सोडून जायचे आहे .होता येईल तेवढं चांगले वागा चांगले काम करा व इतरांना मदत करा हा व्हिडिओ तयार करण्याचा एकच उद्देश आहे की याची प्रेरणा घेऊन इतरांनी पण तुमच्या सक्तीने सार तुमच्या आसपास मदत करावी हीच अपेक्षा तुमच्या इन्कम मधील थोडासा वाटा गोरगरिबांचा राहू द्या याचे पुण्य भेटून तुमच्या लेकरा बाळांना नक्कीच आशीर्वाद मिळेल कारण की प्रत्येक जण आपल्या लेकरा बाळांसाठी मेहनत कष्ट करत असतो पण त्या येणाऱ्या पैशात कुणाची तरी अशा असते म्हणून आपण आपल्या इच्छेने मदत करणे गरजेचे आहे तर येणाऱ्या काळात त्याचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल आणि आपल्या जीवनात येणारे संकट कमी होतील देवाने तुम्हाला हुशार आणि पैशावाला त्यासाठीच बनवला असतं की तुम्ही इतरांना किंवा वंचित गरीब अपंग किंवा अनेक व्यक्तींना मदत करताल. असं वक्तव्य प्राध्यापक अण्णासाहेब मतकर यांनी केले आहे,

# आदर्श ग्रामपंचायत आवरगाव चा आदर्श उपक्रम; गावातील महिलांच्या आरोग्याची काळजी घेत घेतले आरोग्य शिबिर



धारूर (प्रतिनिधी):– धारूर तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत आवरगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावाला निमिया मुक्त करण्याच्या उद्देशाने विशेष महिला आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देत विविध तपासण्या व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या आरोग्य शिबिरात स्त्री रोग तज्ञ डॉ. चेतन आदमाने सर, स्त्री रोग तज्ञ सौ. आदमाने मॅडम, डॉ. श्री. चौधरी सर , डॉ. अरविंद निकते सर, डॉ. भोसले मॅडम डॉ. वाघमारे सर व सर्व आरोग्य टीमने उपस्थित महिलांची सखोल तपासणी करून मार्गदर्शन केले. महिलांमध्ये निमियाचे प्रमाण कमी व्हावे,तसेच त्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती व्हावी, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश होता. शिबिरादरम्यान महिलांची एचबी (हिमोग्लोबिन) तपासणी, शुगर तपासणी, बीपी तपासणी करण्यात आली. तसेच आवश्यक त्या औषधांचा मोफत पुरवठाही करण्यात आला. आरोग्य तपासणीसोबतच महिलांना आहार, स्वच्छता आणि आरोग्यविषयक सल्लाही देण्यात आला. I कार्यक्रमासाठी आवरगावचे आदर्श सरपंच अमोल जगताप, ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे, तसेच पत्रकार सूर्यकांत जगताप यांची उपस्थित होती. गावातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या आरोग्य शिबिरामुळे महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढली असून, गाव निमिया मुक्त करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# शेतात काम करणाऱ्या ६५ वर्षीय शेतकऱ्यावर रानडुकराचा जीवघेणा हल्ला; गंभीर जखमी, जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू

बीड (प्रतिनिधी) बीड तालुक्यात वन्यप्राण्यांकडून शेतकऱ्यांवर हल्ले होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. तालुक्यातील पाली येथे आपल्या शेतात काम करणाऱ्या एका वयोवृद्ध शेतकऱ्यावर रानडुकराने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात शेतकरी शेख करीम शेख नजीर (वय ६५, रा. पाली, ता. बीड) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेख करीम शेख नजीर हे काल नेहमीप्रमाणे पाली शिवारातील त्यांच्या शेतात काम करत होते. याच वेळी अचानक एका रानडुकराने त्यांच्यावर हल्ला चढवला. हा हल्ला इतका भीषण होता की, यात शेख नजीर यांना हाताला गंभीर दुखापत झाली. त्यांच्या किंकाळ्या ऐकून परिसरातील नागरिकांनी धाव घेतली आणि त्यांना रानडुकराच्या तावडीतून सोडवले. रक्तस्राव झाल्यामुळे त्यांना तात्काळ उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, रानडुकरांकडून होणारे शेतीचे नुकसान आणि आता थेट शेतकऱ्यांवर हल्ले होण्याच्या घटनांमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने यावर तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**सिरसाळा :– नागपूर हिवाळी अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अजित दादा पवार साहेब यांना नागपूर विधानभवन येथे अधिवेशनात भेट घेऊन सिरसाळा ग्रामपंचायतला नगरपंचायतचा दर्जा मिळावा यासाठी युवा सेनेच्या वतीने युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी निवेदन दिले.**



# महिला उद्योजकता मेळावा उत्साहात संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या ग्राम ऊर्जा फाउंडेशन, अंबाजोगाई यांच्या पुढाकाराने तसेच यूथ एड, पुणे, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, डॉ. के. आर. श्रॉफ फाउंडेशन आणि सृजन अ‍ॅग्रो टेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित महिला उद्योजकता मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

या मेळाव्यात अंबाजोगाई तालुक्यासह परिसरातील विविध गावांमधील सुमारे २०० महिला उद्योजकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविक भाषणात ग्राम ऊर्जा फाउंडेशनचे अध्यक्ष दादासाहेब गायकवाड यांनी धएड डींाळीं २०२५ चा उद्देश विशद करत, मागील वर्षभरात महिलांसाठी राबविण्यात आलेल्या



उद्योजकता विकास, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मिती विषयक उपक्रमांचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला.

या प्रसंगी सृजन अ‍ॅग्रो टेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या महिला गटाचा 'उत्कृष्ट महिला उद्योजक गट' म्हणून गौरव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रांत यशस्वी ठरलेल्या महिला उद्योजकांनी आपल्या प्रेरणादायी यशोगाथा नवउद्योजक महिलांशी शेअर करत व्यवसाय उभारणीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

मेळाव्यात महिलांनी स्वतः तयार केलेल्या अन्नप्रक्रिया, कृषीपूरक उत्पादने व हस्तकला वस्तूंच्या विक्री व प्रदर्शनाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यासोबतच ग्राम ऊर्जा फाउंडेशनमार्फत उपलब्ध असलेल्या रोजगार संधी, उद्योजकता विकास प्रशिक्षण तसेच विविध शासकीय योजनांबाबत उपस्थित महिलांना सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाला रोटरीचे प्रांतपाल श्री. सुधीर लातुरे, तहसीलदार श्री. विलासजी तरंगे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. राहुल गायकवाड, ग्राम ऊर्जा फाउंडेशनचे अध्यक्ष दादासाहेब गायकवाड, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्ष सौ. रोहिणी पाठक, कृषी विज्ञान केंद्राच्या रोहिणी भरड, माविमचे श्री. विलास जगताप, कोरो इंडिया फेलो श्री. सूर्यभान जाधव, ग्राम ऊर्जा फाउंडेशनचे सचिव श्री. अशोक हातागळे, रोटरीचे श्री. उमेश तापडिया, सौ. संगीता लातुरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजिवनी गुळभीले व शामल राउत यांनी केले. महिला उद्योजकतेला चालना देणारा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी ग्राम ऊर्जा फाउंडेशनच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

# निमसाखरचे प्रा. राहुल भोसले यांना पीएच.डी (डॉक्टरेट) पदवी

इंदापूर (प्रतिनिधी) प्रा. राहुल भोसले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची (छत्रपती संभाजीनगर) पीएच.डी पदवी नुकतीच जाहीर झाली आहे. पीएच.डी ही शैक्षणिक क्षेत्रातील सर्वोच्च पदवी मानली जाते. त्यांचे शैक्षणिक परिश्रम, सातत्यपूर्ण संशोधनकार्य आणि कठोर मेहनतीला मिळालेले हे मोलाचे यश आहे. सध्या प्रा. राहुल भोसले हे महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्था संचलित, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी, सिंधुदुर्ग येथे कॉमर्स विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.



त्यांनी कळंब येथील विश्वासराव रणसिंग महाविद्यालयातून पदवी (बी.कॉम) पर्यंतचे शिक्षण तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत त्यांनी वाणिज्य विभाग व संशोधन केंद्रातून पदव्युत्तर (एम.कॉम) चे शिक्षण पूर्ण केले आहे. तसेच ते जून २०१२ मध्ये यू.जी.सी नेट परीक्षा देखील उत्तीर्ण आहेत. त्यांनी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा, धाराशिव येथील प्रोफेसर डॉ. केशव लेंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पतपुरवठा धोरणांची अंमलबजावणी आणि अनुत्पादक मालमत्तेच्या व्यवस्थापन पद्धतीचा अभ्यास (महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विशेष संदर्भासह) या विषयावर त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वित्तपुरवठा धोरणे, त्यातील अडचणी, कर्जवाटप प्रक्रिया तसेच एन.पी.ए व्यवस्थापनातील त्रुटी आणि सुधारणा यांचा सखोल अभ्यास करून त्यांनी हा प्रबंध सादर केला. दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित मौखिक परीक्षेमध्ये प्रमुख परीक्षक म्हणून डॉ. संदीप गायकवाड (छत्रपती संभाजीनगर) व बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. श्याम साळुंखे (जळगाव) हे ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते. संशोधनाच्या गुणवत्तेमुळे त्यांचा शोधप्रबंध मान्य करण्यात आला आणि त्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. राहुल भोसले यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री विनोदजी तावडे , संस्थेचे सर्व विश्वस्त, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एन. व्ही.गवळी , उपप्राचार्य व कॉमर्स विभाग प्रमुख डॉ. एम.आय.कुंभार, कार्यालयीन अधीक्षक श्री.संजय रावराणे , महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रा. राहुल भोसले यांचा शैक्षणिक प्रवास हा धैर्य, चिकाटी आणि गुणवत्तेचे प्रतीक असून त्यांच्या पुढील संशोधन आणि शैक्षणिक कार्यासाठी सर्वांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# सखोल नात्याचे प्रतिक – स्व.विलास पत्की

## आदरणीय विलास काकांचे निधन म्हणजे मोठा धक्का....

आजही ते दिवस मला आठवतात स्वांतत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या देशपांडे गल्लीतील महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचे ते अध्यक्ष होते


त्या वेळी सर्वांना सोबत घेऊन त्यांनी वेगळ्या पद्धतीने गणेशोत्सवाला साजेसे धार्मिक कार्यक्रम केले होते. त्या काळात आम्हा तरूणांना स्वसामर्थ्यावर,स्व कष्टाने कसे काम करावे याची शिकवण विलास काकांकडून मिळाली.

धाडसी वृत्ती,करारी बाणा,खणखणीत भाषा,खंबीर



साथ,प्रत्येकाचा मान सन्मान, संस्कारमय जीवन अशा त्यांच्या दिशादर्शक व्यक्तीमत्वाने सर्वत्र ओळख निर्माण केली होती खरे पाहता प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या अंगी ध्येय आणि चिकाटीने समाजात आपल्या कर्तृत्वाचा ठसा कसा निर्माण करावा ते विलास काकांकडून शिकण्या सारखे होते. त्यांच्या संस्कारित वृत्तीमुळे ते सखोल नात्यांचे प्रतिक बनले होते भारतीय मजदुर संघ,जुना जनसंघ, रा.स्व.संघ या संघटना मधून अविस्मरणीय कार्य केले. त्यांच्या नुसत्या सहवासामुळे अनेकजण जीवनात उभे राहिले हे त्यांच्या अंत्यसंस्कार समयीच्या गर्दीवरून लक्षात येते. भारतीय आर्युविमा महामंडळात कार्य केले ती केलेली सेवा सदैव इतरांना प्रेरणादायीच म्हणावी लागेल. सेवानिवृत्तीनंतर त्यांना प्रिय असलेल्या अंबाजोगाई या कर्मभूमीत त्यांनी शेती, सामाजिक कार्य यात स्वतःला गुंतून घेतले होते.त्यांचे अस्तित्व स्मरणीय राहील. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

**राहूल दि. देशपांडे**
**अंबाजोगाई**



बीड – कोहिनूर लॉन्स येथे देशमुख परिवारातील सदस्य अमानत अली देशमुख यांच्या वालिमा (रिसेप्शन) तसेच फैसल देशमुख यांच्या विवाह सोहळ्यानिमित्त शुभेच्छा देताना शेख फहीम, बिलाल देशमुख व हिंगोली चे शिवसेना (उबाठा ) नेते वसीम देशमुख व इतर.

# गेवराई महावितरण मध्ये अनागोंदीचा कळस! अधिकारी ओळखपत्र वापरत नाहीत

## 'आंदोलन केल्याशिवाय' सामान्य जनतेची कामे होत नाहीत!

बीड (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील गेवराई उपविभागीय महावितरण कार्यालयाचा कारभार पूर्णपणे अनागोंदी आणि शिस्तहीन बनल्याचे चित्र आहे. शासकीय नियमांचे उल्लंघन करणारे वरिष्ठ अधिकारी आणि प्रलंबित कामांच्या ढिगाऱ्यामुळे सामान्य ग्राहक कमालीचे त्रस्त झाले आहेत.

वरिष्ठ अधिकारीच 'शासन निर्णयाचे उल्लंघन' महावितरण कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी कामावर असताना ओळखपत्र वापरणे बंधनकारक आहे, असा स्पष्ट शासकीय निर्णय असतानाही गेवराई उपविभागातील अनेक वरिष्ठ अधिकारी या नियमांचे सर्रास उल्लंघन करत आहेत. नियमांऐवजी मनमानी का ?अधिकारीच जर ओळखपत्र वापरत नसतील, तर कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य ग्राहकाला नेमका आपला प्रतिनिधी कोण, हे ओळखणे कठीण झाले




आहे. या मनमानी कारभारावर मोठा आक्षेप घेतला जात आहे. शिस्तीचा अभाव दिसत असून वरिष्ठच नियमांचे पालन करत नसल्यामुळे, कार्यालयात शिस्त आणि पारदर्शकता यांचा पूर्णपणे अभाव दिसून येत आहे. 'आंदोलन' हाच कामासाठी एकमेव मार्ग! ओळखपत्राच्या अनागोंदीसोबतच, गेवराई उपविभागात सामान्य जनसामान्यांची अनेक महत्त्वाची कामे अनेक महिन्यांपासून प्रलंबित पडलेली आहेत. नवीन कनेक्शन असो, नावात बदल असो किंवा ट्रान्सफॉर्मर संबंधित दुरुस्ती असो, नागरिकांना कार्यालयाच्या चकरा मारूनही प्रतिसाद मिळत नाही. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, इथे साधी कामंही वेळेत होत नाहीत. काम मार्गी लावण्यासाठी सामान्य ग्राहकाला अधिकाऱ्यांच्या दारात सतत हेलपाटे मारावे लागतात पान २ वर...

# बंजारा आणि धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्या-आ. विजयसिंह पंडित

### विधानभवनात आरक्षणाचा मुद्दा गाजला; बंजारा-धनगर समाजासाठी सरकारकडे तात्काळ निर्णयाची मागणी

गेवराई, (आरंभ वृत्तसेवा):- विधानभवनात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करताना गेवराई तालुक्याचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी बंजारा (लमाण) आणि धनगर समाजाला अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे, अशी जोरदार व ठाम मागणी केली. आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, बंजारा आणि धनगर हे समाज ऐतिहासिकदृष्ट्या व सामाजिक-शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले असून, त्यांना न्याय देण्यासाठी एसटी प्रवर्गातील आरक्षण लागू करणे अत्यावश्यक आहे. शासनाने स्वीकारलेल्या ऐतिहासिक नोंदी, गॅझेटीअर व विविध अहवालांनुसार या समाजांचा अनुसूचित जमातींशी घनिष्ठ संबंध स्पष्टपणे दिसून येतो. ते पुढे म्हणाले की, देशातील इतर काही राज्यांमध्ये या समाजांना अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या सवलती मिळत आहेत, मात्र महाराष्ट्रात अजूनही निर्णय प्रलंबित असल्यामुळे लाखो कुटुंबावर



अन्याय होत आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रातील बंजारा आणि धनगर समाज एकमुखाने एसटी आरक्षणाची मागणी करत आहे, हे शासनाने गांभीर्याने लक्षात घ्यावे. त्यामुळे बंजारा व धनगर समाजाला अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानभवनात करत सरकारचे लक्ष वेधले. या दोन्ही समाजांवर ऐतिहासिक अन्याय झाला असून, सामाजिक-शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपण लक्षात घेता एसटी प्रवर्गातून आरक्षण देणे हाच न्याय्य मार्ग आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आज राज्यातील बंजारा व धनगर समाज एकमुखाने एसटी आरक्षणाची मागणी करत असून, शासनाने याबाबत तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी विधानभवनात केली.

# स्व:गोपीनाथरावजी मुंडे साहेब आज प्रत्यक्ष आपल्या सोबत नसले तरी त्यांचे विचार पंकजाताई मुंडे यांच्या रूपाने आजही जनतेसोबत आहेत - गणेश लांडे

बीड (प्रतिनिधी):- लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब आज प्रत्यक्ष स्वरूपात आपल्या सोबत नसले तरी त्यांचे विचार, त्यांची तत्त्वे आणि जनतेप्रती असलेली सेवाभावना पंकजाताई मुंडे यांच्या कार्यातून आजही समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचत असल्याचे मत भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी व्यक्त केले.

लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीड येथील भाजपा जिल्हा कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन भाजपा जिल्हा




सरचिटणीस गणेश लांडे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

या रक्तदान शिबिराचा उद्घाटन सोहळा भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ड. सर्जेराव तात्या तांदळे, भाजपा नेते योगेश भैय्या क्षीरसागर, नवनाथ आण्णा शिराळे, मीराताई गांधले, अशोक लोढा, अजय सवाई, अनिल चांदणे, इर्शाद भाई, सुनीलजी मिसाळ, भाग्यश्री ढाकणे, आदित्यजी सारडा आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिराच्या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांना मोफत रक्तपुरवठा होऊन रक्ताच्या तुटवड्यावर मात करण्यास मदत होत आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून समाजातील प्रत्येकाने अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी बाबुराव परळकर, ओमप्रकाश गिरी, प्रमोद रामदासी, अमोल वडतीले, राजू शहाणे, संदीप उबाळे, गोविंद शिराळे, महादेव नागरगोजे, पान २ वर...

### स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त

# आरोग्य तपासणी शिबिर ,रक्तदान शिबीर व शैक्षणिक साहित्य वाटप



बीड (प्रतिनिधी):- स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त रामतीर्थ एमआयडीसी पेठ बीड विभाग येथे आरोग्य तपासणी शिबिर ,रक्तदान शिबीर व शैक्षणिक साहित्य वाटप आयोजन भाजपा अनुसूचित जाती प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे यांनी केले होते. सर्वप्रथम साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास माजी मंत्री बदामराव((आबा) पंडीत,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथजी (आण्णा)शिराळे,भाजपा बीड शहराध्यक्ष अशोकजी लोढा,भाजपा जेष्ठ नेते प्रा.देविदासजी नागरगोजे सर, नगरसेवक जगदीशजी(भैय्या) गुरखुदे,भाजपा युवा नेते आदित्यजी सारडा,भाजपा जिल्हा कोषाध्यक्ष चंद्रकांतजी फड, भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी बीड जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव , जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, डॉ.रविंद्र घुमरे,डॉ. अभय वणवे, गणेश लांडे,अमर सानप,विशाल भैया खाडे ,पदाधिकारी यावेळेस उपस्थित होते.

# ३१व्या अखंड नामस्मरण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता

### श्री क्षेत्र दत्तमंदिरा पर्यंत ३०० मी. पायऱ्यांचे बांधकाम स्वखर्चातून करण्याचा संकल्प - राजेंद्र मस्के

बीड (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील पाटोदा बे (बेलखंडी) येथील श्री क्षेत्र दत्तमंदिरात ३१व्या अखंड नामस्मरण व गीता पारायण सोहळ्याची सांगता मोठ्या भक्तिभावाने पार पडली. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी भाविकांच्या सोयीसाठी मंदिरापर्यंत ३०० मीटर लोखंडी ग्रीलसह पायऱ्यांचे बांधकाम स्वखर्चातून करून देण्याचा संकल्प जाहीर केला. श्री दत्तमंदिराचे अध्यात्मिक आणि ऐतिहासिक वैभव असलेले पाटोदा दत्तनगर येतील



हे श्री दत्तमंदिर सुमारे दोनशे वर्षांहून अधिक जुने असून महानुभाव पंथाच्या परंपरेचे प्रतीक आहे. उंच टेकडीवरील या मंदिरात जाण्यासाठी वयोवृद्ध व महिला भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता पायऱ्यांचे बांधकाम झाल्यानंतर सर्व भक्तांना सुलभपणे देवदर्शन करता येईल, अशी श्रद्धाळूंची अपेक्षा आहे. सोहळ्याचा सांगता समारंभ किर्तन केसरी परमपूज्य श्री पांढरीकर बाबा महानुभाव (खेडी खेडगाव, जळगाव) यांच्या सुश्राव्य कीर्तनाने झाली. त्यांच्या कीर्तनातून ज्ञान, भक्ती आणि वैराग्याचा संदेश सर्वत्र पसरला. या प्रसंगी श्रीधरदादा जामोदेकर संदिपाण बडगे, रविंद्र बडगे, गणेश बडगे, आजीनाथ बडगे, कैलास बडगे, अशोक बडगे, महादेव बडगे, नवनाथ बडगे, यैगेश बडगे, गोविंद बडगे, बाबासाहेब बडगे, कालीदास बनसोडे, चक्रधर बडगे, राजेंद्र वाघमारे, दीगांबर बडगे, निवांत बडगे, पान २ वर...

# बीड जिल्ह्यातील सिरसाळा ग्रामपंचायतला तातडीने नगरपंचायतीचा दर्जा देण्याची युवासेना कावरे यांची राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्याकडे मागणी!

सिरसाळा (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील सिरसाळा ग्रामपंचायतीला तातडीने नगरपंचायतीचा दर्जा मिळावा, अशी मागणी युवा सेनेचे विधानसभाप्रमुख कैलास मदनराव कावरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे केली आहे. सिरसाळा ग्रामपंचायतीची वाढती लोकसंख्या, मोठी भौगोलिक व्याप्ती आणि बाजारपेठेचे स्वरूप विचारात घेऊन हा महत्त्वाचा निर्णय घेण्याची



विनंती पत्राद्वारे करण्यात आली आहे. सिरसाळा ग्रामपंचायतीमध्ये नगरपंचायतीच्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असल्याने, गावाला तात्काळ नगरपंचायतीचा दर्जा मिळाल्यास परिसराचा विकास वेगाने होईल, असे म्हटले आहे. त्यांनी उपमुख्यमंत्र्यांना या सर्व बाबींचा विचार करून सिरसाळा ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये तातडीने रूपांतर करण्याची नम्र विनंती केली आहे. या मागणीवर सरकार काय निर्णय घेते याकडे आता सिरसाळा आणि परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

फ्मागणीची प्रमुख कारणे

मोठी लोकसंख्या: २०११ च्या जनगणनेनुसार सिरसाळा गावाची लोकसंख्या वीस हजारांहून अधिक आहे. फ्सर्वात मोठी ग्रामपंचायत:

सिरसाळा ही जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे, जिथे १७ सदस्य आणि १ सरपंच अशी मोठी कार्यकारिणी आहे. फ्वाढलेले भौगोलिक क्षेत्र= गावाचे भौगोलिक क्षेत्र मोठ्या पान २ वर...

# होर्डिंग्जमुक्तीसाठी नाशिक पॅटर्न बीडमध्ये राबवावा

### बॅनरवर झळकलेल्या चेहऱ्यावर थेट एफआयआरची मागणी-डॉ. गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी):- नाशिक शहरात अनधिकृत बॅनर व होर्डिंग्जविरोधात राबवण्यात आलेल्या कडक कारवाईमुळे होर्डिंग्जमुक्तीचा नाशिक पॅटर्न राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे. नाशिक शहर पोलिसांनी अवघ्या १० दिवसांत बॅनरवर झळकलेल्या व्यक्तींवर थेट एफआयआर दाखल करत २१ पेक्षा अधिक गुन्हे नोंदवले आहेत. याच धर्तीवर बीड शहरातही कठोर कारवाई




करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT